MHPU180013342017

नि. दिवाणी दावा क्र. २३७/२०२७
दत्तात्रय व इतर
विरुध्द
देवईबाई व इतर

निशाणी क्र. ३३ वर आदेश
(पारीत दिनांक २२/०८/२०२४)

सदरचा अर्ज वादी क्र. १ यांनी वादी क्र. २ यांचे मयत वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी सदरचा दावा अतिक्रमण काढून मिळण्याकरीता व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना वादी क्र. २ हे दिनांक ०१/१०/२०२१ रोजी पूणे येथे मयत झाले असून त्यांचे वारस प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल करणे गरजेचे आहे. सदर अर्जदार यांनी वादी क्र. २ यांचे वारसांचे विवरण सदर अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केले आहे. तसेच त्यांनी दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालण्याकामी प्रस्तुत वादी क्र. २ यांचे वारस यांना दाव्यात समाविष्ट करुन घेण्याबाबतचे व त्याबाबत दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या मार्फत सदर अर्जास जाबब दिला असून त्यांनी त्यातील मजकूर नाकारला आहे. सदर प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी यांनी सन २०१७ मध्ये दावा दाखल केल्यापासून कोणताही प्रामाणिक प्रयत्न दावा चालवण्याकरीता घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांना संयुक्तीक कारण नसताना सदरचा अर्ज दाखल केल्याचे म्हटले आहे. सदर प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार वादी क्र. २ हे दि. ०१/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर अर्जाच्या पृष्ठयार्थ त्यांनी निशाणी ३४ वर दाखल केलेल्या यादीप्रमाणे वादी क्र. २ यांचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच तत्पुर्वी वादी यांनी अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज निशाणी ३१ अन्वये दाखल केल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी सदर अर्जास विरोध दर्शविला असले तरी निशाणी ३१ वरील आदेशान्वये अबेटमेंट सेट असाईड

अर्ज रक्कम रुपये १०००/– (रक्कम रुपये एक हजार फक्त) खर्चासह मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता तसेच सदरचे प्रकरण स्थावर मालमत्तेचे असल्याबाबतचा विचार करता वादी क्र. १ यांना वादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देणे न्यायोचित राहिल. सबब मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र. १ यांनी आवश्यक ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करावी.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2024.08.26 12:51:20 +0530

दिनांक- २२/०८/२०२४.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 22/08/2024. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 22/08/2024. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 26/08/2024. |